# नमुना -3

## खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने ताब्यात घेण्यासाठी जमीन मालक किंवा हितसंबंधित व्यक्तीकडून हरकती / सूचना मागविण्याबाबत जाहीर नोटीस

उपविभागीय अधिकारी चांदूर रेल्वे यांचे कार्यालय,
पत्ता :- चांदूर रेल्वे,
दिनांक : 09/08/2018

क्रमांक : सखप्र.क्र. 51/47/2016-2017 मौजा- शिवणी (वे साईड ॲमेनिटी)

ज्या अर्थी, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी महाराष्ट्र समृध्दी महामार्गाचे (नागपूर-मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गाचे) बांधकाम या सार्वजनिक प्रयोजनाकरीता शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण - 03/2015/प्र.क्र.34/अ-2, दिनांक 12 मे, 2015 व दिनांक 30 सप्टेंबर, 2015 मधील तरतुदीस अनुसरून खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांचे नावे घेण्याबाबत प्रस्ताव जिल्हाधिकारी, अमरावती यांचेकडे सादर केला आहे;

ज्या अर्थी, जिल्हाधिकारी, अमरावती यांचे आदेश क्रमांक अका/विभूसअ(अवप्र)क्र.2/कावि-939/18 दिनांक 26/07/2018 अन्वये उक्त प्रस्तावासंबंधी उक्त शासन निर्णय दिनांक 12 मे, 2015 व दिनांक 30 सप्टेंबर, 2015 आणि तदनुषंगिक शासन निर्णय, तसेच शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. एलक्यूएन-01/2017/प्र.क्र.12/अ-2,दिनांक 25 जानेवारी, 2017 प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत;

ज्या अर्थी उपविभागीय अधिकारी, चांदूर रेल्वे जिल्हा अमरावती यांनी अनुसूची - एक मध्ये नमूद खाजगी क्षेत्रातील जमिन खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादीत यांचे नावे घेण्याबाबत नमुना - 1 मधील जाहीर नोटिस दि. 30/07/2018 रोजी प्रसिध्द केली आहे;

आणि ज्या अर्थी, उक्त जाहीर नोटिसीद्वारे संबंधित जमिन धारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमिन खाजगी वाटाघाटीद्वारे सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादीत यांचे नावे खरेदी देण्यास स्वेच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णत: व अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतची संमतीपत्रे (विकल्प) मागविण्यात आलेली आहेत;

त्या अर्थी, आता

1. मी, श्रीमती स्नेहल कनीचे, उपविभागीय अधिकारी, चांदूर रेल्वे जिल्हा अमरावती याद्वारे, अनुसूची - एक मध्ये नमूद खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादीत यांचे नावे खरेदी करण्यात येणार असल्याने, या अनुसूची मध्ये नमूद सर्व्हे नंबर / गट नंबर मधील जमिनीच्या मालकी हक्कांबाबत व न्यायालयीन दाव्यांबाबत जमीन मालकांकडून किंवा हितसंबंधीत व्यक्तींकडून ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून 15 दिवसाच्या आत हरकती किंवा सूचना विहीत नमूना-4 मध्ये मागवित आहे किंवा त्यांना माझ्यासमोर उपस्थित राहण्यास सांगत आहे.
2. हरकती किंवा सूचनांचा विहीत नमुना-4 उपविभागीय अधिकारी, चांदूर रेल्वे / कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (महामंडळाच्या प्राधिकृत अधिकारी) यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. तसेच सदर नमुना या कार्यालयामार्फत / महामंडळाच्या प्राधिकृत अधिकाऱ्यामार्फत भूधारकांना उपलब्ध करून देण्यात येईल.
3. सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या आराखड्याची प्रत उपविभागीय अधिकारी, चांदूर रेल्वे यांच्या कार्यालयामध्ये / मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, "साईछाया" पहिला माळा, भारतीय स्टेट बँकेजवळ, साई नगर, अमरावती - 444607 प्राधिकृत अधिकाऱ्याच्या कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबंधित व्यक्तींना तसेच जनतेस निरीक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.
4. ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून 15 दिवसांच्या आत जमीनीच्या मालकी हक्काबाबत व न्यायालयीन दाव्यांबाबत जमीन मालकांकडून किंवा हितसंबंधीत व्यक्तींकडून प्राप्त झालेल्या हरकतींची किंवा सूचनांची चौकशी करण्यात येईल आणि संबंधित हरकत घेणाऱ्यांना त्यांच्या हरकतींच्या किंवा सूचनांच्या समर्थनार्थ तोंडी वा कागदोपत्री पुरावा सादर करण्यासाठी जातीने किंवा वकिलामार्फत किंवा कोणत्याही कायदेशीर व्यक्तीमार्फत उपस्थित राहण्याची मुभा असेल.

5. उक्त कालावधीमध्ये हरकती किंवा सूचना प्राप्त न झाल्यास, उक्त जमिनीबाबत अन्य कोणत्याही व्यक्तीचे हितसंबंध नाहीत असे गृहीत धरुन, कायदेशीर शीर्षक अहवालाच्या अनुषंगांने जमिन धारकाकडून उक्त जमिन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.

मौजा :- **शिवणी (वे साईड ॲमेनिटी)**, तालुका :- **नांदगाव खंडेश्वर**, जिल्हा :- **अमरावती**

| अ.क्र. | गावाचे नाव | भूमापन क्रमांक / गट नं. | क्षेत्र (हे. आर.) |
|---|---|---|---|
| १ | शिवणी | ५३/१/अ | ०.६६ |
| २ | शिवणी | ५४ | १.१३ |
| | | | १.२६ |
| ३ | शिवणी | ५५/४ | ०.०३ |
| ४ | शिवणी | ५५/५ | ०.५९ |
| ५ | शिवणी | ६६/१ | ३.५५ |
| ६ | शिवणी | ६६/२ | १.१८ |
| ७ | शिवणी | ६६/३ | ०.०८ |
| ८ | शिवणी | ६६/४ | ०.०२ |
| ९ | शिवणी | ६७/१ | ०.०६ |
| १० | शिवणी | ६७/२ | ०.०८ |
| ११ | शिवणी | ७३/१ | ०.८९ |
| १२ | शिवणी | ७३/१/अ | ०.६७ |
| १३ | शिवणी | ७३/१ ब | ०.२४ |
| १४ | शिवणी | ७३/२ | ०.०४ |
| | | | ०.७९ |
| १५ | शिवणी | ७३/२/अ | ०.३२ |
| **एकूण क्षेत्र** | | | **११.५९** |

दिनांक : 09/08/2018.
ठिकाण : चांदूर रेल्वे

सक्षम अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,
चांदूर रेल्वे, जिल्हा अमरावती